**प्रेसनोट दिनांक १७/०७/२०१९**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन**

**बंडगार्डन पोलीसांनी हरविलेल्या मतिमंद मुलाचा शोध घेवून त्यास त्याचे आत्याचे ताब्यात दिले.**

दिनांक १४/०७/२०१९ रोजी ११.०० वा.चे सुमारास एक मुलगा, वय १५ वर्षे,रा.घोरपडी पुणे हा कौन्सील हॉल परिसरातुन हरवला होता. त्याची आत्या रा सदर यांनी कौन्सील हॉल पोलीस चौकीत येवून सांगितले. तात्काळ महिला पोलीस उप-निरीक्षक गायकवाड यांनी मार्शलचे कर्मचारी यांना सदर बाबत माहिती दिली. सदर मुलाचा शोध घेत असताना, आयबी बंगल्याकडून पुणे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर सदर मुलगा मिळून आला. त्यास ताब्यात घेवून कौन्सील हॉल पोलीस चौकीत आणले.चौकीत थांबलेल्या त्याचे आत्यास त्याने ओळखले. सदर मुलास त्याची आत्या यांचे ताब्यात दिले. त्यांनी काही तक्रार नसल्याचे सांगून पोलीसांचे आभार मानले.

सदरची चांगली कामगिरी महिला पो.उप-निरीक्षक गायकवाड, पो.ना. खैरे, पोशि. सावंत, यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे

